जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUN 2021
पुढारी

# बी.एस्सी.,एम.कॉम.,एम.एस्सी. अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत सोमवारी बी.एस्सी.,एम. कॉम., एम.ए., एम.एस्सी. अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. २३ विद्यार्थांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे परीक्षा विभागाच्या वतीने निरसन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 JUN 2021
तरूण भारत

# ग्रामीण भागातील महाविद्यालयाचे आंतरराष्ट्रीय ई-चर्चासत्र गौरवास्पद

वार्ताहर
नेसरी

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

■ नेसरीत कोलेकर महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय ई-चर्चासत्र

ग्रामीण भागातील कोलेकर महाविद्यालयाने हिंदी भाषेत आंतरराष्ट्रीय ई– चर्चासत्र आयोजन करणे गौरवास्पद आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. येथील शिक्षण समिती कसबा नेसरी संचलित तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय व सृजन ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय ई– पत्रिका, ऑस्ट्रेलिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय वेबीनार उद्घाटन प्रसंगी बोलत होते. संस्था अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य ॲड हेमंत कोलेकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. शिर्के म्हणाले, महाविद्यालयाने वेबीनार आयोजित करून मीडीया, साहित्य, समाज व संस्कृती चार विषयांच्या योगदानवर प्रकाश टाकला आहे.

ॲड. कोलेकर म्हणाले, आंतरराष्ट्रीय ई– चर्चासत्राच्या आयोजनातून विश्वच माझे घर संकल्पनेला पुष्टी मिळते आहे. प्र. प्राचार्य डॉ. एस. बी. भांबर यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. अर्जुन चव्हाण, सुप्रसिद्ध लेखिका डॉ.पुष्पिता अवस्थी (नेदरलॅंड), उच्च शिक्षा व शोध संस्थान हैद्राबादचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. संजय मादार, डॉ. दिपक तुपे, सृजन ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय ई– पत्रिका ऑस्ट्रेलियाचे मुख्यकार्यकारी अधिकारी श्रीमती पूनम चतुर्वेदी यांनी मार्गदर्शन केले. या सत्रांचे अध्यक्षस्थान अनुक्रमे डॉ. शैलेश शुक्ला, डॉ. भाऊसाहेब नवले, शिक्षण समिती कसबा नेसरीच्या संचालिका डॉ. अर्चना कोलेकर यांनी भूषविले.